RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ९, अंक १९] सोमवार, फेब्रुवारी १३, २०२३/माघ २४, शके १९४४ [पृष्ठे ६, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ३९**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १३ फेब्रुवारी २०२३.

**अधिसूचना**

**भारतीय संविधान.**

क्रमांक.औसुवआ-०३१३/प्र.क्र.३१/कामगार-१.— भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून आणि या बाबतीत केलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा संलेख यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्राचे राज्यपाल याव्दारे महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या नियंत्रणाखालील औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाच्या आस्थापनेवरील वरिष्ठ रसायन शास्त्रज्ञ, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, प्रयोगशाळा सहायक या गट-क च्या पदांच्या सेवाप्रवेशाचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत :—

१. (१) या नियमांना, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयातील वरिष्ठ रसायन शास्त्रज्ञ, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, प्रयोगशाळा सहायक, गट-क यांचे सेवाप्रवेश नियम-२०२३ असे संबोधण्यात यावे.

(२) सदर नियम **शासन राजपत्र** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर—

क) “पदवी” याचा अर्थ, कोणत्याही सांविधिक विद्यापीठाची पदवी, असा आहे ;

ख) “विभाग” याचा अर्थ, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १६६ अन्वये बनविलेल्या महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीच्या पहिल्या अनुसूचिमध्ये विनिर्दिष्ट केलेला, “उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग”, असा आहे ;

(ग) "संचालनालय" याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या अधिपत्याखालील "औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य", असा आहे ;

(घ) "शासन" याचा अर्थ, "महाराष्ट्र शासन" असा आहे ;

(च) "निवड समिती" याचा अर्थ, संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य या कार्यालयासाठी दुय्यम सेवेतील गट-क च्या पदांवरील उमेदवारांची निवड करण्याकरिता शासनाच्या मान्यतेने गठित केलेली निवड समिती, असा आहे.

३. संचालनालयाच्या आस्थापनेवरील "वरिष्ठ रसायन शास्त्रज्ञ, गट-क" या पदावरील नियुक्ती पुढील मार्गाने करता येईल :—

(क) संचालनालयाच्या आस्थापनेवरील प्रयोगशाळा तंत्रज्ञ, गट-क हे पद धारण करणाऱ्या तसेच सदर पदावर किमान तीन वर्षाहून कमी नसेल इतकी नियमित सेवा झालेल्या तसेच या नियमाच्या पोटनियम (ख)(दोन) नुसार शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तींमधून ज्येष्ठता अधीन पात्रता या निकषावर योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने करण्यात येईल.

**किंवा**

(ख) सदर पद पदोन्नतीने भरण्यासाठी पात्र व्यक्ती उपलब्ध नसल्यास, निवड समितीकडून घेण्यात येणाऱ्या स्पर्धात्मक परीक्षेच्या निकालाच्या आधारे शिफारस करण्यात आलेल्या, खाली नमूद अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे, जे—

(एक) ३८ वर्षांपेक्षा जास्त वयाचे नाहीतः

परंतु, आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत वयोमर्यादा पाच वर्षांपर्यंत शिथिल केली जाईल ;

(दोन) सांविधिक विद्यापीठाची विज्ञान शाखेतील ॲनालिटिकल केमिस्ट्री किंवा एनव्हायरन्मेंटल सायन्स या विषयासह पदव्युत्तर पदवी धारण करतात ;

**आणि**

(तीन) कोणत्याही उद्योगामधील/ शासकीय खात्यामधील/ शासनाने स्थापित केलेल्या औद्योगिक उपक्रमामधील/ स्थानिक प्राधिकरणामधील/ महामंडळामधील, रासायनिक किंवा प्रदूषणविषयक प्रयोगशाळेतील किमान ३ वर्षे इतका प्रत्यक्ष कामाचा अनुभव धारण करतात.

४. संचालनालयाच्या आस्थापनेवरील "प्रयोगशाळा तंत्रज्ञ, गट-क" या पदावरील नियुक्ती, प्रयोगशाळा सहायक या पदावर किमान तीन वर्षे नियमित सेवा पूर्ण केलेल्या व्यक्तींमधून ज्येष्ठता अधीन पात्रता या निकषावर योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने करण्यात येईल.

५. संचालनालयाच्या आस्थापनेवरील "प्रयोगशाळा सहायक,गट-क", या पदावरील नियुक्ती, निवड समितीकडून घेण्यात येणाऱ्या स्पर्धात्मक परीक्षेच्या निकालाच्या आधारे शिफारस करण्यात आलेल्या, खाली नमूद अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल, जे—

(एक) ३८ वर्षांपेक्षा जास्त वयाचे नाहीतः

परंतु, आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत वयोमर्यादा पाच वर्षांपर्यंत शिथिल केली जाईल ;

(दोन) सांविधिक विद्यापीठाची विज्ञान शाखेतील मायक्रोबायोलॉजी किंवा बायोकेमिस्ट्री किंवा बायोलॉजी (बॉटनी किंवा झूऑलॉजी) किंवा केमिस्ट्री या विषयासह पदवी धारण करतात ;

(तीन) शासन मान्यता प्राप्त संस्थेची वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्रज्ञान पदविका (डिप्लोमा इन मेडिकल लेबोरेटरी टेक्नॉलॉजी) धारण करतात ;

**आणि**

(चार) कोणत्याही रासायनिक किंवा रोगनिदान विषयक प्रयोगशाळेतील किमान २ वर्षे इतका कामाचा प्रत्यक्ष अनुभव धारण करतात ;

६. (एक) नियम ३ आणि ४ मध्ये नमूद केलेल्या पदांवर पदोन्नतीने नियुक्त केलेल्या व्यक्तीने, सदर पदांवर पदोन्नती होण्यापूर्वी, शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार मराठी आणि हिंदी भाषा परीक्षा जर तो आधीच उत्तीर्ण झाला नसेल तर, उत्तीर्ण केलेली असणे अथवा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळविलेली असणे आवश्यक राहील.

(दोन) नियम ३ आणि ५ मध्ये नामनिर्देशनाद्वारे नमूद केलेल्या पदांवर नियुक्त केलेल्या व्यक्तीने, शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार मराठी आणि हिंदी भाषा परीक्षा जर तो आधीच उत्तीर्ण झाला नसेल तर, विहित कालमर्यादेत उत्तीर्ण होणे अथवा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळविणे आवश्यक राहील. जोपर्यंत तो त्या परीक्षा उत्तीर्ण होत नाही तोपर्यंत तो वार्षिक वेतनवाढीसाठी किंवा पुढील पदोन्नतीच्या पदावर पदोन्नतीसाठी पात्र असणार नाही.

७. (एक) नियम ३ आणि ४ मध्ये नमूद केलेल्या पदांवर पदोन्नतीने नियुक्त केलेल्या व्यक्तीने, सदर पदांवर पदोन्नती होण्यापूर्वी, शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार संगणक हाताळणीबाबतचे ज्ञान असणे अथवा त्यापासून सूट मिळविलेली असणे आवश्यक राहील.

(दोन) नियम ३ आणि ५ मध्ये नामनिर्देशनाद्वारे नमूद केलेल्या पदांवर नियुक्त केलेल्या व्यक्तीने, शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार संगणक हाताळणीबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त केलेले नसेल तर, विहित कालमर्यादेत सदर प्रमाणपत्र धारण करणे अथवा ते सादर करण्यापासून सूट मिळविणे आवश्यक राहील. जोपर्यंत तो सदर प्रमाणपत्र धारण करत नाही तोपर्यंत तो वार्षिक वेतनवाढीसाठी किंवा पुढील पदोन्नतीच्या पदावर पदोन्नतीसाठी पात्र असणार नाही.

८. (एक) नियम ३ आणि नियम ५ येथे नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ मधील तरतुदीनुसार व त्याबाबत वेळोवेळी करण्यात येणाऱ्या नियमांनुसार, नियुक्तीच्या वेळी लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा, ती व्यक्ती सदर पदावर नियुक्तीसाठी पात्र ठरणार नाही.

(दोन) लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करताना त्यामध्ये दोन पेक्षा अधिक अपत्ये नियुक्तीच्या वेळेस हयात असल्यास संबंधित उमेदवार शासकीय नियुक्तीसाठी अपात्र राहील.

(तीन) एखादी व्यक्ती शासन सेवेत नियुक्त झाल्यानंतर त्या व्यक्तीस दोन पेक्षा अधिक अपत्ये असल्याचे सिद्ध झाले तर ती व्यक्ती शासकीय सेवेतील सदर पदावरील नियुक्तीसाठी अपात्र राहील.

९. वरिष्ठ रसायन शास्त्रज्ञ, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, प्रयोगशाळा सहायक ही पदे संचालनालयाच्या आस्थापनेवर अस्तित्वात असल्याने, नियम ३, ४ आणि ५ येथे नमूद केलेल्या पदांवर नियुक्त होणाऱ्या व्यक्ती संचालनालयाच्या मुंबई कार्यालयातच कार्यरत राहतील.

१०. शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी या नियमांद्वारे विहित करण्यात आलेल्या अटी व शर्तींची पूर्तता करणे आवश्यक आहे. सदर नियमांनुसार शासकीय सेवेत नियुक्ती झाल्यानंतर, संबंधित शासकीय कर्मचाऱ्यास, शासकीय सेवेच्या कालावधीत, महाराष्ट्र नागरी सेवा नियम, तसेच सेवाविषयक बाबींसंदर्भात राज्य शासनाने वेळोवेळी अधिनियम/ अधिसूचना/ शासन निर्णय/ शासन आदेशाद्वारे निर्गमित केलेले अन्य नियम लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विनीता वेद सिंगल,**
शासनाचे प्रधान सचिव (कामगार).

(In pursuance of clause (3) of Article-348 of the Constitution of India, the following translation in English of the Government Notification, Industries, Energy & Labour Department No.DISH-0313/CR -31/LABOUR-1, dated 13th February, 2023 hereby published under the authority of the Governor.)

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VINITA VAID SINGAL,
Principal Secretary (Labour) to Government.

**INDUSTRIES, ENERGY & LABOUR DEPARTMENT**

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,

Mantralaya, Mumbai 400 032, Dated the 13th February 2023.

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No.DISH-0313/CR-31/Lab-1.— In exercise of the powers conferred by the proviso to Article 309 of the Constitution of India and in supersession of all existing rules, orders, instruments made in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the posts of Senior Chemist, Laboratory Technician, Laboratory Assistant, Group-C on the establishment of the Directorate of Industrial Safety and Health under the Industries, Energy and Labour Department of the Government of Maharashtra namely :—

1. (1) These rules may be called "the Senior Chemist, Laboratory Technician, Laboratory Assistant, Group-C in the Directorate of Industrial Safety & Health (Recruitment) Rules, 2023.

(2) These rules shall come into force on the date of publication of these rules in the *Government Gazette.*

2. In these rules unless the context requires otherwise —

(a) "Degree" means a degree of a Statutory University;

(b) "Department" means the Department of Industries, Energy and Labour Department of the Government of Maharashtra specified in the First Schedule appended to the Maharashtra Government Rules of Business made under article 166 of the Constitution of India;

(c) "Directorate" means the Directorate of Industrial Safety & Health, Maharashtra under the control of the Industries, Energy and Labour Department of the Government of Maharashtra;

(d) "Government" means the Government of Maharashtra.

(e) "Selection Committee" means the Selection Committee constituted with the approval of the Government for selection of the candidates for Group-C posts in the office of the Director;

3. Appointment to the post of "Senior Chemist, Group C" on the establishment of Directorate shall be made either—

(a) **By promotion** of a suitable person on the basis of seniority subject to fitness from amongst the persons holding the post of "Laboratory Technician, Group-C" at the Establishment of the Directorate having not less than three years of regular service on that post and possesses the educational qualification mentioned in sub-clause (ii) of clause (b);

OR

(b) If the eligible candidate is not available for promotion, then by nomination of candidates recommended by selection committee on the basis of result of competitive examination conducted by it, who fulfil the conditions mentioned below,—

(i) are not more than 38 years of age:

Provided that, the age limit shall be relaxed upto five years in case of the candidates belonging to the reserved category;

(ii) Possess a post graduate Degree of a Statutory University in Science in Analytical Chemistry or Environmental Science;

AND

(iii) have at least three years of actual work experience in Chemical or Pollution related laboratory in any Industry or Department of Government or Government established Industrial Undertaking or Local Authority or Statutory Corporation.

4. Appointment to the post of "Laboratory Technician, Group C" on the establishment of Directorate shall be made by Promotion on the basis of seniority subject to fitness from amongst the persons holding the post of Laboratory Assistant, Group C at the Establishment of the Directorate having not less than three years of regular service on that post.

5. Appointment to the post of "Laboratory Assistant, Group C" on the establishment of Directorate shall be made, By Nomination of candidates recommended by selection committee on the basis of result of competitive examination conducted by it, who fulfil the conditions mentioned below—

(i) are not more than 38 years of age:

Provided that, the age limit shall be relaxed upto five years in case of the candidates belonging to the reserved category;

(ii) Possess a Degree of Statutory University in Science in Microbiology or Biochemistry or Biology (in Botony or Zoology) or Chemistry;

(iii) has completed a Diploma in Medical Laboratory Technology (DMLT) from the Government recognized Institute.

AND

(iv) have at least two years of actual work experience in Chemical or Pathological Laboratory.

6. (1) A person appointed to the posts mentioned in rules 3 and 4 by promotion shall pass the Marathi and Hindi Languages examinations, as per the rules made in that behalf by the Government, from time to time, unless he has already passed or has been exempted from passing those examinations before getting promoted to the said posts.

(2) A person appointed to the posts mentioned in rules 3 and 5 by nomination shall pass the Marathi and Hindi Languages examinations, as per the rules made in that behalf by the Government, from time to time, within prescribed time limit after appointment unless he has already passed or has been exempted from passing those examinations. He shall not be eligible for annual increment or for the promotion to the next promotional post, until he passes those examinations.

7. (1) A person appointed to the posts mentioned in rules 3 and 4 by promotion shall possess a knowledge of Computer Operations prescribed by the Government, from time to time, unless he has been exempted therefrom before getting promoted to the said posts.

(2) A person appointed to the posts mentioned in rules 3 and 5 by nomination shall possess a knowledge of Computer Operations prescribed by the Government, from time to time, within prescribed time limit after appointment unless he has been exempted from possessing such certificate in knowledge of Computer Operations, otherwise, he shall not be eligible for annual increment or for the promotion to the next promotional post, until he possess such certificate.

8. (1) A person appointed to the posts mentioned in rules 3 and 5 shall submit a declaration of Small Family as per the provisions of the Maharashtra Civil Services (Declaration of Small Family) Rules, 2005 or any other rules, orders or any instruments issued in this behalf, by the Government, from time to time, otherwise, he shall not be eligible for appointment to the post.

(2) A person having more than two children on the date of submission of Declaration of Small Family, shall be disqualified for the appointment in Government Service.

(3) After appointment of a person in the Government Service, if it is proved that he has more than two children, then he shall be disqualified for the appointed post in Government Service.

9. The posts of Senior Chemist, Laboratory Technician and Laboratory Assistant, Group-C are on the establishment of the Directorate. Therefore, the persons appointed to the posts mentioned in Rules 3, 4 and 5 shall be working in the Mumbai office of the Directorate, only.

10. The terms and conditions prescribed by these rules must be fulfilled for appointment to the Government Service. After being appointed in the Government service as per the said rules, Maharashtra Civil Service Rules and other rules issued by the State Government from time to time through Acts/Notifications/Government Decisions/ Government Orders shall be applicable to the concerned Government employee during the period of Government service.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VINITA VAID SINGAL,
Principal Secretary (Labour) to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.